Vol 6 Issue 7 Jan 2017

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 7 | JANUARY - 2017

# बंदिशकार व कलाकार : अभिव्यक्तीतील तौलनिक विचार



डॉ. मीनल ठाकरे
सहयोगी प्राध्यापक
संगीत विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
अमरावती (महाराष्ट्र)

**सारांश :**

तसा या विषयाचा आवाका फार मोठा आहे. शास्त्रीय संगीतात जितके महत्व कलाकाराला आहे तेवढेच त्याने गायलेल्या बंदिशीच्या बंदिशकारालाही आहेच. कारण प्रत्येक बंदिशीतील बात समजून मगच ती प्रस्तुत करून दाद घेणे म्हणजे ती दाद आपसुकच दोघांनाही मिळालेली असते. बंदिशीची निर्मिती होते तेव्हा स्वर व शब्दांची सांगड, शिवाय रागाचा भाग, त्यानुसार आलेले स्वरलगाव, हा सर्वच विचार बंदिशकार करतो, इतर गाण्यांचा रचयिता ज्याला आपण गीतकार म्हणतो त्याला रागमर्यादेचे बंधन नसते. पण शास्त्रीय संगीतात हा विचार प्रामुख्याने करावा लागतो. एखादे सुंदर गीत गाणारा कलाकार व बंदिश प्रस्तुत करणारा कलाकार ह्यांच्यात म्हणूनच नेमका कुठला भेद आहे, .... असायला पाहीजे हाच विचार करण्यासाठी बंदिशकार व कलाकार ह्यांच्या कडून झालेल्या निर्मिती व प्रस्तुतीचा देखिल पर्यायाने विचार करावा लागेल. हाच मुद्दा लक्षात घेवून विषय निवडी मागील मनोभुमिका स्पष्ट करणे महत्वाचे वाटले.

**प्रस्तावना :**

अर्थपूर्ण बंदिशींचा विचार करण्याआधी केवळ नोम् तोम्, दे रे न - त द रे दानी, रितनन, या तबल्याचे बोल असणाऱ्या 'तराना' या गीतप्रकारात मग बंदिशकाराची गरजच नाही काय ? तर नाही. शब्दाच्या पलीकडे पण तरीही अर्थाच्या परीघामध्ये बंदीस्त अशी ही तरान्याची बंदिश म्हणजे गायकासाठी मुक्त गायकीची पर्वणीच असते. पण तिही जितकी सोपी वाटते तितकी सोपी नाही. किंबहुना अर्थपूर्ण बंदिशीपेक्षाही जास्त कठीण आहे. शिवाय लय देखील वेगवान ठेवावी लागते त्यामुळे तयारीही भरपूरच लागते. म्हणूनच कसलेला गायकच तरान्याची लयकारी करून श्रोत्यांना खिळवून ठेवू शकतो. मग ह्यातून अभिव्यक्त काय होतं ? तर स्वर, ताल, लय, गायकाचा विचार आणि रागमर्यादा ह्या सर्वांचा सुसूत्र मेळ साकार होत असतो. म्हणूनच बंदिशकार व कलाकार हे दोघेही छान पद्धतीने श्रोत्यांना उमजत असतात.

बंदिशकाराबद्दल बोलतांना गुरूशिष्यांच्या नात्यातून प्रसवलेली बंदिश कशी असू शकते व शिष्य आपल्या सादरीकरणाने तिला कोणते रूप देतो हा प्रसंग इथे उद्धृत करावासा वाटतो. गुरूच्या प्रेमाखातर बंदिशी रचणारे शिष्य अनेक आहेत, परंतु शिष्याची पाठवणी करतांना बंदिश रचणारे अण्णासाहेब रातांजनासारखे गुरू विरळच. आपला शिष्य, गुरूजींचा मानसपुत्र, गानयोगी पं. डी. वी. पलुस्कर, ह्यांच्या गुरूगृहातून बाहेर पडतांनाचा हा किस्सा आहे. शिष्याला निरोप देतांना अण्णासाहेबांनी एक बंदिश बचून शिष्यालाा आशिर्वाद दिला, 'लाख करार जियो, जियो नादके पुजारी...... सदा रहो रत संगीत सुधारसमें हो' हा रागही त्यांचा स्वत:चाच होता, वियोगवराळी ![१]

यावरून एक लक्षात येतं की बंदिशीची निर्मीती ही कुठल्यातरी भावाभिव्यक्तितून होत असते. इथे, आपल्या शिष्याने जन्मभर संगीतसेवा, नादोपासना करावी हीच तीव्र इच्छा बंदिश व्यक्त करते. जेव्हा व्यक्तिश: तो शीष्यच ही बंदिश कलाकार म्हणून आपल्या गुरूसमोर गायील तेव्हा त्याच्या गायकीतून आश्वस्त करणारा भाव जर श्रोत्याला अर्थात गुरूला दिसला तर ती झाली बंदिशकार व कलाकार ह्यांच्या अभिव्यक्तितील सापेक्षता.

'बंदिश' ही ख्यालगायनातून साकार झाली हे जरी खरे असले तरी धृपदगायन हा त्याचा मूळ गाभा आहे हे विसरता येणार नाही. धृपद गायना आधी जी रीतनन् ची गायकी केली जाते तिचा उद्देश केवळ राग विस्तार- रागदर्शन एवढाच असतो. ख्यालगायनात राग आणि बंदिश एकाच वेळी सुरू होते. शिवाय संगीताला विविध घराण्यांचे वरदान लाभल्यामुळे प्रत्येक घराण्यानुसार एकच बंदिश विविधरित्या गायली जावू शकते. किंबहुना प्रत्येक घराण्याच्या काही ठराविक बंदिशी त्या-त्या घराण्याती श्रेष्ठ गायकांनी गावून अजरामर करून ठेवल्या आहेत. परंतू पुढे 'ख्याल गायन' हे संगीतातील घराण्याच्या चौकटीत जे तोपर्यंत बंद झालेले होते, ते पुढे (१९५२ च्या काळात) काहीसे मोकळ्या वातावरणात प्रवेश करू लागलेले होते.[२] त्यात पं. कुमार गंधर्वासारख्या प्रयोगशिल व अत्यंत प्रतिभावान कलाकारांचे नाव अग्रगण्य राहील.

बंदिश ही कुठलीही असो शब्दरहित वा शब्दसहित, त्यातून बंदिशकाराच्या रचनाकौशल्याचा व कलाकाराच्या आविष्काराचा जो प्रभाव श्रोत्यांवर पडतो तो निश्चितच खूप आनंददायी असतो. शब्दरहित संगीताबाबत पं. अल्लादियाँ खाँ साहेबांचे स्पषट मत होते की, 'जर मानवाला संगीतातून स्वानुभव मिळवायचा असेल, व त्याबरोबरच आत्मानंद अनुभवायचा असेल; तर संगीत हे शब्दातीत असणे अनिवार्य आहे. कंठ संगीतातील ख्यालगायन ही शैली देखील शब्दातीतच म्हणावी लागेल. कारण ख्याल गायनासाठी निवडलेली बंदिश व त्यातील काव्य

हे अंशात्मकच असते. व शब्दाचेही महत्व कमी असते. 'ख्यालगायन' लोकप्रिय होण्याचे कारण हे शब्दातित संगीताच्या जवळ पोचले आहे. यातील आकार-इकार-उकार या गोष्टी स्वरातून प्रकट करण्याची कलावंतांची ताकद व त्याबरोबरच राग-ताल-लय याच्या संगतीत निर्मित आनंद देणारे कलावंत यांच्यामुळेच ख्यालगायन शैली ही अधिक अधिक विकसित होत गेली व ही विकसित प्रक्रिया कायम चालू राहणारी आहे.[३] हे मत त्यांनी फार पूर्वी सांगितले आहे.

एरवी 'बंदिश' या शब्दाचा अर्थ शब्द, स्वर व तालाने बद्ध असलेली असा सर्वसामान्यपणे घेतला जातो. इथे आणखी एक गोष्ट अभिप्रेत असते ती बंदिशीतील बंदिस्तपणा. ती रागानुरूप तिचा चेहरा बदलवते. केवळ शब्दरचना म्हणजे गीत होईल, पण त्या शब्दरचनेला विशिष्ट रागानुरूप व विशीष्ट तालानुरूप बांधणे हेच तर खरे बंदिशकाराचे कसब आहे. बंदिशकाराची बंदिश जेव्हा कलाकार गातो तेव्हा जिथे शब्दवाक्य संपतं तिथेच स्वरवाक्य देखील त्याला संपवावं लागतं. नाही तर अर्थाला धक्का लागण्याची खूप शक्यता असते. उदा. मालकंस रागाची पारंपारिक विलंबित ख्यालाची बंदिश, 'पग लागन दे' ही बघू. ही म्हणतांना जर पगला गन दे म्हंटली तर संपूर्ण अर्धा तास पगला-पगला करून पूर्ण वाट लागेल त्या बंदिशीची. शास्त्रीय संगीतात जरी शब्द रचनेला विशेष महत्व नसले तरी स्वरांना खूप महत्व असल्यामुळे व ते स्वर शब्दांनीच व्यक्त होत असल्यामुळे शब्दवाक्य व स्वरवाक्याचा रागांतील स्वरांचे वादी-संवादित्व, अल्पत्व-बहुत्व व न्यासस्वर ह्यांचा प्रामुख्याने बंदिशकार व पर्यायाने कलाकारालाही फार काळजीपूर्वक वापर करावा लागतो.

कुमारजींनी ख्यालगायकीमध्ये सौंदर्याचे एक नवीन शास्त्र विकसित केलेले आपणाला दिसते. त्यामध्ये मौनाचा एक अत्यंत संवेदनशिल गर्भितार्थाचा जाणीवपूर्वक उपयोग केलेला आढळतो. त्यांचे ते मौन हे शब्दाकडे आपणाला घेवून जाणारे होते. इतकेच नाही तर संगीतातील शब्दांना एक प्रकारची नवी प्रतिष्ठा कुमारजींनी दिलेली आहे, हे मान्यच करावे लागेल.[४]

भारतीय शास्त्रीय संगीतातील थोर कलावंत जेष्ठ गायक पं. ओंकारनाथ ठाकुर, एक उत्तम गायक, उत्तम वक्ता, उत्तम लेखक म्हणून सर्वत्र ओळखले जात. त्या शिवाय संस्कृत, इंग्रजी, बंगाली, नेपाळी, पंजाबी व उर्दू या भाषांचे त्यांना ज्ञान होते. संगीतातील विविध समस्यांबाबत ते मोकळ्या मनाने स्वत:चे विचार प्रगट करीत असत. शास्त्रीय संगीताकडे सामान्य जन विशेष लक्ष देण्याचे कारण, 'भाव व रस यांचा शास्त्रीय संगीतातील अभाव', हे स्पष्ट मत ते मांडीत असत. ''विशेष गोष्ट ही की रसात्मक व भावात्मक अनुभूती पूर्णत्वाने देण्याची क्षमता शास्त्रीय संगीतात आहे, यासाठी कलावंतांनी तसा प्रयत्न करावयास हवा''.[५]

संगीताच्या क्षेत्रात आधीच्या बुजुर्गांनी निर्माण केलेल्या स्वरसृष्टीत पोहता पोहताच सारे आयुष्य संपलेल्या कलावंतांची संख्या काही कमी नाही. पण आपल्या संगीत विश्वाचा हा अनाकलनीय पसारा शोधता शोधता सतत काही नवे निर्माण करण्याचा ध्यास घेतलेले कुमार गंधर्व यांच्यासारखे कलावंत शतकातून एखादेच. सुमारे दोनशे वर्षापूर्वीच्या काळात म्हणजे १७५० ते १८०० या कालावधीत सदारंग आणि अदारंग या काका-पुतण्यांनी अभिजात संगीताच्या क्षेत्रात खूप मोठी कामगिरी केलेली आहे. मैफलीमध्ये अनेकदा बंदिशीमधे पुन्हा-पुन्हा येणारी सदारंग आणि अदारंग ही नावे कुणाची असावीत, हा शोध फार कमी रसिक घेत असतील. पण या दोन प्रतिभवान संगीताकारांनी रचलेल्या बंदिशी आजही गायल्या जातात आणि त्यांच्या त्या निर्मिती मधील सौंदर्याचा शोध घेत असतात. कोणत्याही बंदिशीमध्ये स्वरांचे ठहराव आणि त्यांच्या मांडणीतील सौंदर्य स्थळे यांचा समसमा संयोग होणे ही आवश्यकता असते.[६]

पं. रामाश्रय झा, पं. वि. ना. भातखंडे, पं. वि. डी. पलुस्कर, पं. पी. एन. बर्वे, पंडिता अश्विनी भिडे, डॉ. प्रभा अत्रे, पं. विनायकबुवा पटवर्धन, पं. कुमार गंधर्व इ. नामवंत संगीतकारांच्या बंदिशी प्रामुख्याने गायील्या जातात. काही अज्ञात बंदिशकारांच्या बंदिशी सुद्धा गायकाच्या प्रतिभेला साद घालणाऱ्या आहेत.

प्रियकर-प्रेयसीचा संवाद, सासू आणि नणंदेकडून सतत होत असणारा छळ, कृष्णलीला, ईश्वराची आळवणी, या आणि अशा विषयांच्या विळख्यातून भारतीय संगीताच्या चिजा बराच काळ बाहेर आल्या नाहीत. पण संगीत हा सर्वव्यापी विषय आहे आणि त्याला कुठलाच विषय वर्ज्य असता कामा नये, हा विचार कुमारांनी आपल्या कृतीतून दाखवला. त्यातूनच 'आज पैरी ले गोरी, रंग बसंती चीरां' सारखी बंदिश जन्माला आली तर माध्यान्हीला कापण्यासाठी नेत असलेल्या बकरीच्या टाहोचं सांगीतिक रूप 'मधसुरजा' सारख्या रागातून व्यक्त झालं. लोकसंगीतात दिसणारा निसर्ग त्यांना खुणावत होताच. त्यात दिसणारं हे अनोखं दर्शन अभिजात संगीतातही दिसायला हवं, असा त्यांचा ध्यासच राहिला.[७]

इतर ललीत कलांपेक्षा संगीत ही कला वेगळी आहे ते तिच्या 'अभिव्यक्ति' तील वेगळेपणामुळेच. इतर प्रादर्शिक कला ह्या सापेक्ष असतात. परंतू इथे पूर्णपणे निरपेक्ष अशी अनुभूती येते. किंवा असेही म्हणता येईल कि चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला, नाट्यकला या कुठल्या न कुठल्या तरी प्राथमिक गोष्टींवर अवलंबित असतात. मात्र सूर व लय जी संगीताची अगदी प्राथमिक संसाधने आहेत ती अगदी सहज उपलब्ध होणारी आहे. आणि नंतर तिच्या निर्मितीतून होणारी प्रतिक्रिया अर्थातच आनंदानुभूती ही देखिल तितकीच सहजतेने प्राप्त होत असते. म्हणूनच संगीताला इतर ललित कलांपेक्षा वेगळे मानण्यात येते जे संगीत एकाच वेळी अधिक मोठ्या समूहाला आनंद मिळवून देते, ते वरच्या दर्जाचेच असते, यात शंकाच नाही. स्वरातून निर्माण होणारा भाव कोणताही असला तरी त्यातून केवळ आनंदाचीच निर्मिती होते, हे सूत्र मात्र या सर्वांनी मान्य केले आहे.

म. गांधींनी म्हटल्याप्रमाणे कला अशी हवी कि जी लाखो लोकांशी बोलू शकेल. बंदिशकार असो किंवा गायक कलावंत, जो पर्यंत आपल्या कलाकृतीतून रसिकांशी संवाद साधता येणार नाही, तोपर्यंत त्याच्या प्रतिभेला तितकासा अर्थ उरत नाही. एक फार मोठी गायिका लक्ष्मीबाई जाधव ह्यांचा एक किस्सा इथे उद्धृत करावासा वाटतो. बंशीच्या शब्दातील पवित्रता व त्या शब्दांचे उच्चारण हे त्यांच्या गायनात एकतांना अल्लादियाँ खाँ यांची आठवण करून देणारे भासत. त्यांची तान ही बंदिशीचा अलंकार समजून त्यातील प्रत्येक स्वर हा मौक्तिक मालिकेतील मोत्यासारखा प्रतित होत असे. बोल तान ही स्वर लखीका लपेटलेली असे. बंदिश, तिची मांडणी, तिची भरणी, तिच्यातील उपज अंग, आणि अशासाठी हवा असणारा पल्लेदार आवाज व त्यातील दमसास, सूर, ताल, लय आणि शब्दफेक यामुळे बंदिशीचे निर्मितसौंदर्य, गायनामध्ये तोचतोपणा अथवा फिरून फिरून तीच तानफेक कधीही मैफलीमध्ये ऐकावयास मिळत नसे.

सांगायचे तात्पर्य हेच की आपली कलाकृती ही स्वत:बरोबरच इतरांनाही आनंददायी ठरायला पाहिजे. तरच त्या निर्मितीला खरा न्याय मिळू शकतो. निर्मितीचा स्रोत/उगम जरी बंदिशकार असला तरी त्याचे व्यक्त रूप हे कलाकाराच्या अभिव्यक्तितूनच साकार होत असते. देवळाच्या परिसरात विकसित झालेलं अभिजात संगीत तिथून बाहेर आलं आणि समाजाच्या मध्यभागी येवून चक्क उभं राहिलं, याचं श्रेय मुस्लीम गवयांनाही खुल्या दिलानं द्यायलाच हवं. स्वर त्रिकालाबाधित असतात, असे नुसतं म्हणून चालत नाही, तर त्या स्वरांचा तसा प्रत्यय यावा लागतो. प्रत्यक्ष मैफिलीत जेव्हा उत्स्फूर्त प्रतिभेचे धुमारे कलाकाराच्या आविष्कारातून फुटत असतात तेव्हा ते कुठुन आलेत ह्याचा शोध घेतल्यापेक्षा त्याचा मनमुराद आनंद घेणे हेच एका दर्दी रसिकाचे एकमेव काम आहे.

## निष्कर्ष :

'बंदिश' म्हणजे स्वर व शब्दांची रागनियमांनी युक्त अशी तालाधिष्ठित रागरचना कि जी बंदिशकाराची बात कलाकाराच्या स्वर, ताल, लय, व त्याने केलेल्या त्या बंदिशीवरील विचार ह्यातून साकारल्या जाते. ही अभिव्यक्ती जरी वेगवेगळ्या कलाकारांची असली तरी गेली अनेक वर्षे पारंपारिक बंदिशींना गातांना त्यातील सौंदर्यस्थाने जपण्याची जबाबदारी देखिल त्या कलाकाराला पाळावीच लागते.

---

१. गानयोगी, पं. द. वि. पलुस्कर, अंजली कीर्तने, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, पृ. १०
२. स्वरानुबंध, दत्ता मारूळकर, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृ. ९३
३. स्वरानुबंध, दत्ता मारूळकर, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृ. ८०
४. स्वरानुबंध, दत्ता मारूळकर, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृ. २०
५. स्वरानुबंध, दत्ता मारूळकर, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृ. ८०
६. सभेपासून सभेपर्यंत, मुकुंद संगोराम, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ. ६९
७. सभेपासून सभेपर्यंत, मुकुंद संगोराम, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ. ५५
८. स्वरानुबंध, दत्ता मारूळकर, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृ. ११९

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org